स्वतःची ओळख आणि आत्मविश्वास जीवनात म हत्त्वाचे आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १२ जून २०२५ | अंक १७५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism
All Tours घर ते घर
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या, ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका, व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
अधिक माहितीसाठी संपर्क
99222 22272 / 7602727555

# बच्चू कडू यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाही तर ?
## जरांगे पाटलांचा सरकारला इशारा



माजी मंत्री आणि प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू हे अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन करत आहेत. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला यांच्या वेगवेगळ्या मागण्यांना घेऊन ते आंदोलनाला बसले आहेत. आज मनोज जरांगे यांनी बच्चू कडू यांची भेट घेतली. यावेळी जरांगे यांनी बच्चू कडू यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. तसेच त्यांना तब्येतीची काळजी घ्यायला सांगितली. मनोज जरांगे यांनी नेमकं काय म्हटलं ते जाणून घेऊयात. शेतकऱ्यांनी जात-पात न पाहता रस्त्यावर उतरायला हवं – जरांगे बच्चू भाऊ तुमची मागणी मान्य नाही केली तर आम्ही रस्त्यावर उतरू, सरकारला सळो की पळो करुन सोडू. बच्चू कडू यांच्या मागण्याची मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी. राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी जात-पात न पाहता रस्त्यावर उतरायला हवं. कारण जीवाची बाजी लावणं सोपं नाही' असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. शरद

### तुम्ही तब्येतीची काळजी घ्या – जरांगे

आज मनोज जरांगे यांनी बच्चू कडू यांनी बच्चू कडू यांची भेट घेतल्यानंतर म्हटले की, शेतकऱ्यांचे नेते बच्चू कडू हे गोरगरीबांसाठी अनेक वर्षांपासून संघर्ष करत आहेत. तुम्ही तब्येतीची काळजी घ्या. तुम्ही एकटे नाहीत, आम्ही तुमच्यासोबत आहोत. एखाद्या विषयाला न्याय मिळवायचा असला तर रस्त्यावर उतरावं लागतं. त्यामुळे शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरायला हवं.'

पवारांनीही बच्चू कडू यांना केला होता फोन शरद पवार यांनी काल (मंगळवार) बच्चू कडू यांना फोन करत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच आंदोलनाबाबत माहिती विचारली. यावेळी बच्चू कडू यांनी सांगितले की, "कलेक्टर आणि एसपी भेटायला आले होते, तसेच पालकमंत्र्यांशी बोलणं झालं आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत मीटिंग आयोजित करुन देऊ अशी माहिती दिली आहे. मात्र मी मीटिंगच्या बदल्यात उपोषण मागे घेणार नाही. आम्हाला भेट नको, निर्णय हवा आहे."

# माजी आमदार बच्चू कडू यांच्या आंदोलनास माजलगाव शेकापचा पाठिंबा

माजलगाव : शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी यासह इतर प्रमुख मागण्यांसाठी माजी आमदार बच्चु कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह मंत्रीमंडळ त्यांच्या या आंदोलनाकडे दुर्लक्ष करीत आहे. निवडणूकांपूर्वी कर्जमाफीची घोषणा करणाऱ्या सरकारने आता बच्चू कडू



यांच्या मागण्या मान्य कराव्यात अशा मागणीचे निवेदन शेतकरी मागार पक्षाच्या वतीने उपिवभागीय अधिकारी गौरव इंगोले यांना दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, निवडणुकीपूर्वी कर्जमाफीची घोषणा करणारे शिंदे, फडणवीस, अजित पवार सत्ता मिळाल्यानंतर त्या तिन माकडा प्रमाणे एक बोलत नाहीत. एकाला ऐकू येत नाही आणि एकाला दिसत नाही. म्हणजेच मुक्या, आंधळ्या, बहिऱ्या सारखी अवस्था या सरकारची झाली

# जीवे मारण्याची धमकी प्रकरणी पिता, पुत्रांना केज न्यायालयाने केला अटकपूर्व जामीन मंजूर

केज : तालुक्यातील जीवाचीवाडी येथील हनुमान वस्ती येथे राहणाऱ्या भारत सुदाम चाटे व पप्पू सुदाम चाटे या दोघा भावांना कोयत्याने व कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करुन जीवे मारण्याचा प्रयत्न करून जीवे मारण्याची धमकी दिली. या आरोपाच्या गुन्ह्यातून अप्पाराव सारुक आणि गोकुळ सारुक या पिता, पुत्रांना केज येथील जिल्हा व अप्पर सत्र न्यायालयाने मंगळवारी प्रत्येकी २५ हजाराच्या जमिनावर अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. दि. २८ मे रोजी केज तालुक्यातील जीवाचीवाडी येथील हनुमानवस्ती परिसरातील मेंढीच्या ओघळातील, लमाण बाल येथे दोन गटात हाणामारी झाली होती. भारत सुदाम चाटे यांचे फिर्यादीवरून गोकुळ सखाराम सारुक यांनी कोयत्याने व अप्पाराव गोकुळ सारुक यांने



कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण केली व श्रीकृष्ण सारुक याने पप्पू चाटे याला धरून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. व जीवे मारण्याची धमकी दिली म्हणुन २८ मे रोजी रात्री तिघां विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला होता. याप्रकारणी आरोपीनी ॲड .जगन्नाथ चाळक यांच्या मार्फत गोकुळ सारुक व अप्पाराव सारुक या दोघांनी केज येथील जिल्हा व अप्पर सत्र न्यायालयात अटक पूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. या न्यायालयात दोन्ही पक्षाच्या वतीने सुनावणी घेण्यात येऊन मंगळवारी (दि. १० )अप्पाराव सारुक व गोकुळ सारुक या पिता पुत्रांना काही अटी व शर्ती सह प्रत्येकी २५ हजार रुपयाच्या जमिनावर अटक पूर्व जामीन मंजूर करण्यात आल्याची माहिती सारुक पिता, पुत्रांचे वकील ॲड .जगन्नाथ चाळक यांनी माध्यमाशी बोलताना दिली.

# चोरीला गेलेले दहा लाख पन्नास हजारांचे सोन्याचे दागिणे ४८ तासात परत मिळिवले, बीड शहर पोलिसांची मोठी कामगिरी

बीड, दि. ११: चोरीला गेलेले दहा लाख पन्नास हजार रूपयांचे सोने ४८ तासात परत मिळिवण्यात आले आहेत. बीड शहर पोलिसांनी ही मोठी कामगिरी केली आहे. याबाबत बीड शहर पोलिसांच्या कामाचे बीड शहरातून कौतूक केले जात आहे. याबाबत अधिक माहिती अशी, की दि. आठ जून २०२४ रोजी, डॉक्टर लक्ष्मीकांत आंधळे यांच्या घरातून ते बाहेर गेले असताना घरात प्रवेश करून कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या कपाटात ठेवलेले गळ्यातली चैन, गंठण, आणि अंगठी असे ११ तोळे सोने चोरट्याने चोरी करून नेले होते. दिवसा चोरी झाल्याने पोलिसांपुढे याची आव्हान तयार झाले होते. सीसीटीव्हीच्या मदतीने



त्या भागामध्ये कोण कोण गेले आहे यावर लक्ष ठेवण्यात आले. यातून एका महिलेला अटक करण्यात आली असून तिच्याकडून संपूर्ण गेलेला ऐवज जप्त करण्यात आला आहे. आरोपीचे नाव लक्ष्मी प्रमोद वडमारे (रा. पंचशील नगर बीड) असे आहे. दोनच दिवसात पोलिसांनी चोरीस गेलेल्या मुद्देमाल परत मि ळवल्यामुळे फिर्यादीने सम ाधान व्यक्त केले आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सर्व पोलीस ठाणे प्रभारी यांना सूचना दिलेल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक शितल कुम ार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार संजय राठोड, म नोज परजणे, गहिनीनाथ बावनकर, राम पवार यांनी नमूद गुन्हा उघडकीस आणला आहे.

# माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कमलाकर आंधळे यांचे निधन



बीड, दि.११ (प्रतिनिधी) :- बीडचे तात्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कमलाकर साहेबराव आंधळे यांचे काल बुधवार दि.११ जून २०२५ रोजी संध्याकाळी ८ वाजता पुणे येथील हॉस्पिटलमध्ये अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज दि.१२ जून रोजी बीड शहरातील अंकुशनगर येथील अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. दरम्यान, त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा कपिल कमलाकर आंधळे, मुलगी कल्याणी अरविंद घुगे, जावई आयआरएस अरविंद घुगे बंधू, डॉ.सुधाकर साहेबराव आंधळे, मेहुणे प्रवीण रावसाहेब मिसाळ यांच्यासह सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दरम्यान, त्यांच्या दुःखात दैनिक लोक इच्छा परिवार सहभागी आहे.

# अंबाजोगाई येथे शासकीय वसतिगृहात आदिवासी मुला-मुलींची प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड दि. ११ अंबाजोगाई शहरात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता ८ वी पासून पुढील वर्गातील सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या अंबाजोगाई येथील आदिवासी मुलां मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी wwwswayam.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत. काही अडचण आल्यास गृहपाल, आदिवासी मुलांचे- मुलींचे शासकीय वसतिगृह अंबाजोगाई जि. बीड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

# कर्णकर्कशः आवाजाच्या टू व्हीलर वाहनधारकावर वाहतूक शाखेची कारवाई




बीड (प्रतिनिधी)- दि. ११ जून २०२५ रोजी जिल्हा वाहतूक शाखेची बीड शहरांमध्ये मोठा आवाज करणारे बुलेट सायलेन्सर व मोटर सायकल ला फॅन्सी नंबर प्लेट विरुद्ध विशेष मोहिम राबवून १९ मोठे कर्णकर्कशः आवाज करणारे सायलेन्सर व २५ फॅन्सी नंबर प्लेट यांच्यावर कारवाई करून जप्त करण्यात आले. सदर कारवाई बीड शहर वाहतूक पोलिसांकडून बीड पोलीस अधीक्षक नवनीत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन यांचे मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखा प्रभारी अधिकारी सपोनी सुभाष, पीएसआय विजय , पोलीस कर्मचारी शिवदास, पो.कॉ.वसीम, पो.कॉ.अनिकेत, पो.कॉ.ड्रायव्हर संतोष यांनी केली आहे.सदरच्या कार्यवाहीमुळे फॅन्सी नंबरप्लेट ठेवर्णाया वाहनधारकांचे तसेच ठोऽऽ ठोऽऽ आवाज करर्णाया वाहनधारकांचे धाबे दणाणले असून नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सरपंच ग्रामसेवा परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी भागवत गव्हाणे यांची निवड

किल्ले धारुर : धारूर तालुक्यातील धुनकवाड येथील युवा सरपंच भागवत प्रभाकर गव्हाणे यांची सरपंच ग्रामसेवा परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. गेल्या दोन वर्षांपूर्वी धुनकवाड येथील ग्रामपंचायतची निवडणूक झाली आणि या निवडणुकीत मातब्बराला पराभवाची धूळ चारत मोठ्या मताधिक्यांनी चितपट करत फक्त आठ मतं असलेले गोपाळ समाजातील कुटुंबाच्या व्यक्तीला धुनकवाडकरांनी भरभरून प्रतिसाद देऊन मोठ्या मताधिक्याने निवडुन दिले. भागवत गव्हाणे हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक व राजकीय कार्यात अग्रेसर आहेत.त्यांनी अनेक निराधारांना आधार देण्याचे काम केले आहे.ही काम करण्याची पद्धत व आवड असल्यामुळे व त्यांच्या कामाची दखल घेऊन धुनकवाडचे युवा सरपंच भागवत गव्हाणे यांना सरपंच ग्रामसेवा परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड करुन सरपंचासाठी काम करण्याची संधी मिळाली आहे.भागवत गव्हाणे म्हणाले की,मी सरपंचासाठी चांगले काम करेल व सरपंचांना काही अडचणी भासल्यास त्याचा पाठपुरावा करून त्या



सोडवण्यासाठी मी कटीबद्ध राहिल व माझ्यावर जी जबाबदारी दिली आहे ती मी चांगल्या पद्धतीने पार पाडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तरी भागवत गव्हाणे यांची निवड जाहीर होताच त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यानंतर जिल्हा रुग्णालयात वर्षाच्या मृतदेहाचे शवविच्छेदन केले जात आहे. मात्र जोपर्यंत वर्षाच्या मारेकर्यांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल होत नाही आणि त्यांना अटक केली जात नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार केले जाणार नाही, अशी भूमिका माहेरच्या लोकांनी घेतली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १२ जून २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## खासदार शिष्टमंडळे पाठवण्याचा मास्टरस्ट्रोक

ऑपरेशन सिंदूरफ नंतर भारताच्या न्याय्य भूमिकेस पाश्चात्त्य देश, माध्यमे यांनी योग्य तो न्याय दिला नाही, अशी एक सर्वसाधारण भावना आपल्याकडे व्यक्त झाली. आपल्यावर दहशतवाद लादणाऱ्या पाकिस्तानला इतरांनी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून जितके खडसावयाला हवे होते तितके त्यांनी केले नाही. त्यात भारत-पाकिस्तान संघर्षात आपणच शस्त्रसंधी घडवून आणला असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एकदा नव्हे तर तीन वा चार वेळा सांगून आपणावर अन्याय केला. सबब आपल्या सत्ताधीशांच्या मनात पाश्चात्त्य माध्यमे, विचारवंत, राज्यकर्ते इत्यादींबाबत एक अढी असते. म्हणून या सगळ्यांस आपण भीक का घालावी असा एक प्रश्न सतत आपल्या राज्यकर्त्यांकडू न प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे विचारला जात असतो. तो योग्य. पण तरी जगास आपली भूमिका समजावून सांगण्यासाठी सर्वपक्षीय खासदार शिष्टमंडळे पाठवण्याचा ङ्गमास्टरस्ट्रोकफ निर्णय आपल्या शासकांनी घेतला. त्यानुसार ५९ खासदार ३२ देशांची सैर करून आले. डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कांगो, सिएरा लिओन, लायबेरिया, गयाना, ब्राझील, पनामा, कोलंबिया, स्लोवेनिया, अल्जेरिया, बहारीन, इथियोपिया, डेन्मार्क आदींसह अमेरिका, जपान, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, इटली अशा देशांस या खासदार-मंडळांनी भेटी दिल्या. या दौऱ्यात या सर्वांनी मिळून ७२ निवेदने प्रसृत केली. खासगी क्षेत्रात जेव्हा एखाद्या कर्मचाऱ्यास कंपनीखर्चाने परदेशी पाठवले जाते तेव्हा आल्यावर त्याने काय साध्य केले त्याचा आढावा घेतला जातो. भारत सरकारही तितक्याच कार्यक्षमतेने काम करत असल्याने या दौऱ्यांचा जमाखर्च मांडण्याच्या प्रयत्नाचे स्वागतच होईल. तो मांडण्याआधी एक प्रश्न. एका बाजूने या परदेशीयांची पत्रास आपण ठेवायची गरजच काय, असे मत व्यक्त केले जात असताना त्यांच्या समोर आपण आपली बाजू मांडायला मुळात गेलोच का? यातील पाश्चात्त्य देश, विचारवंत, माध्यमे भारतद्वेष्टी आहेत, भारताची प्रगती त्यांस बघवत नाही, भारत मोठा झालेला त्यांस नको आहे इत्यादी इत्यादी भावना सत्ताधीशांठायी असताना ङ्गआम्ही किती चांगले आणि पाकिस्तान किती वाईटफ अशी स्वसमर्थनाची गरज आपणास का वाटावी? दुसरे असे की यातील कित्येक देशांचे प्रमुख हे आपल्या पंतप्रधानांचे जीवश्चकंठश्च मित्र तरी आहेत किंवा त्यांचे मोठे चाहते तरी आहेत. उदाहरणार्थ अनुक्रमे अमेरिका आणि इटली. असे असताना मित्रांसमोर आपली बाजू मांडण्याची आवश्यकता काय? बरे, ती आहे असे मानले तर निदान त्या देशाच्या सर्वोच्च नेत्यांनी म्हणजे आपल्या पंतप्रधानांच्या मित्र/चाहत्यांनी- आपल्या शिष्टमंडळांचे स्वागत करून त्यांचे ऐकून घ्यायला हवे. तेंव्हा अमेरिकेत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इटलीत पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी आपल्या शिष्टमंडळांचे आदरातिथ्य करून त्यांस सन्मानाने वागवणे अपेक्षित होते. कारण ज्या प्रमाणे ट्रम्प आपल्या पंतप्रधानांचे मित्र आहेत त्याच प्रमाणे मेलोनी या आपल्या पंतप्रधानांच्या निस्सीम चाहत्या आहेत. तेव्हा या उभयतांकडून अशी अपेक्षा करणे गैर नाही. परंतु तसे झाल्याचे दिसत नाही. अमेरिकेत उपाध्यक्ष जेडी व्हान्स हे आपल्या शिष्टमंडळास भेटले आणि इटलीत तेथील प्रतिनिधीगृहाच्या फुटकळ समिती प्रमुखांपलीकडे कोणी अन्य आपल्या शिष्टमंडळास सामोरे गेल्याचे दिसत नाही. भारत-पाक संघर्षात अमेरिकेचे उपाध्यक्ष व्हान्स यांनी ङ्गभारत आणि पाकिस्तान त्यांचे त्यांचे काय ते बघून घेतीलफ अशा अर्थाचे विधान केले होते, त्याचे स्मरण या प्रसंगी अनुचित ठरणार नाही. ही शिष्टमंडळे आपण पाठवली कारण पाश्चात्त्य माध्यमांनी ङ्गऑपरेशन सिंदूरफ ते सुरू करण्यामागील आपली अपरिहार्यता आणि या मोहिमेतील आपले भव्य यश यांची दखल घेतली नाही, असे एक समर्थन या संदर्भात केले गेले. त्यातील तथ्याबाबत दुमत नाही. त्यामुळे पुढील प्रश्न असा की या ३२ देशांतील किती प्रमुख प्रमुख माध्यमांनी या भारतीय लोकप्रतिनिधी भेटीस विस्तृत प्रसिद्धी देत त्यावर संपादकीय भाष्य अथवा टिप्पणी केली? सिएरा लिओन, कांगो, पनामा अशा देशांत आपल्या खासदार दौऱ्यास भरपूर प्रसिद्धी दिली असे एक वेळ मान्य करता येईलही. कारण दृष्टीआड सृष्टी. पण जे दृष्टीसमोर आहे त्यांचे काय? म्हणजे

# कृत्रिम वाळू ( एम सॅन्ड ) वापरा . निर्मितीसाठी शासनाच्या विविध सवलती : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

.बीड प्रतिनिधी शासनाने शासकीय कामासाठी एम सॅन्ड ( मॅन्युफॅक्चर्ड सॅन्ड ) अर्थात कृत्रिम वाळूचा वापर करणे बंधनकारक केले आहे . यामुळे सध्या जिल्ह्यात कृत्रिम वाळू निर्मिती करणारे फारसे उद्योग नसल्याने शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात अडचणी येत होत्या . यामुळे जिल्ह्यात किमान ५० कृत्रिम वाळू निर्मिती केंद्र सुरू करण्यात यावीत असे आवाहन जिह्लाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे .

नुकतीच जिह्लाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिह्लाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिह्लाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांची व्हिडिओ कॉन्फरन्स घेतली . यावेळी वाळू निर्मिती प्रकल्प सुरू करण्याचे आवाहन उद्योजकांना करावे असे ठरले . नद्यामधून निर्मित होणाऱ्या वाळूमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत . वाळू माफिया , गुन्हेगारी असे अनेक गैरप्रकार होत आहेत . यामुळे शासनाने बांधकाम प्रकल्पांमध्ये कृत्रिम वाळूचा वापर वाढावा यासाठी धोरण निश्चित केले आहे . यानुसार , शासकीय बांधकामांमध्ये कंत्राटदाराने २० टक्के कृत्रिम वाळूचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे .

कृत्रिम वाळू कशी बनते : - सध्या वापरात असलेली प्रचलित वाळू ही नदीमध्ये जमा झालेली असते . नदीमध्ये उत्खनन करून वाळू काढली जाते . याबाबत अनेक धोरणे बदलली . पूर्वी एखादा वाळूघाट निश्चित करून विशिष्ट कालावधीसाठी ठेकेदारांना विशिष्ट ब्रास वाळू काढण्याची मुभा दिली जात होती . तथापि यामुळे ठेकेदार , गावकरी , रस्तेवाले यांच्यात वाद निर्माण होत होते . अनेक बेकायदेशीर बाबींची सुरुवात झाली . गुन्हेगारी वाढली . वाळूचे विक्री दरही निश्चित नव्हते .त्यानंतर एक ते पाच वर्षासाठी वाळू घाट निश्चित करून एका डेपोपर्यंत वाळू आणून ठेवावी व तिथून पुढे लाभार्थ्यांपर्यंत पोहोच करावी अशी पॉलिसी ठरली . तथापि यातही अनेक त्रुटी होत्या . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळविल्यानुसार कृत्रिम वाळू ही दगडाचा चुरा करून तयार केली जाते . यामुळे कृत्रिम वाळूचा दर्जा नदीमध्ये उत्खनन करून काढलेल्या वाळू पेक्षा चांगला असतो . तसेच आकाराने छोटी किंवा मोठी अशा प्रकारामध्ये कृत्रिम वाळू तयार केली जाते . यामुळे बांधकामाचा दर्जा वाढतो .

नदयांच्या पर्यावरणीय समतोलासाठी नदयांमधील नैसर्गीक वाळू सुरक्षित पध्दतीने वापरणे आवश्यक आहे . त्यामुळे नैसर्गिक वाळूला एम-सॅन्ड ( कृत्रिम वाळू ) पर्याय म्हणुन तयार करणे आवश्यक आहे . राज्यात वाळूची उपलब्धता कमी असल्याने सदर तुटवडा परराज्यातुन येणा-या वाळूमधुन भागवला जात आहे . तथापी भविष्यातील विकासकामांसाठी निश्चीत केलेली उद्दिष्टे पाहता राज्यातील वाळुची मागणी अनेक पटीने वाढण्याची शक्यता आहे . शासनाने व न्यायालयाने पर्यावरणपुरक मानके लागू






केल्यामुळे नदीपात्रातील वाळूची उपलब्धता मर्यादित झाली आहे . त्यामुळे नदीपात्रातुन निघत असलेल्या वाळूची जागा घेऊ शकतील अशा दर्जेदार बांधकाम योग्य वाळूची गरज एम-सॅन्ड व्दारे पुर्ण केली जाऊ शकते . यासाठी शासनाने दिनांक २३ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार राज्यात विविध बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा ( एम सॅन्ड ) वापर करण्याकरीता धोरण निश्चीत केलेले आहे .

५० केंद्र : - बीड जिल्ह्यात ५० कृत्रिम वाळू निर्मिती केंद्र स्थापन करण्यास प्रशासनाकडून मान्यता देण्यात येणार आहे . यासाठी उद्योग सुरू करण्यास इच्छुक असणाऱ्यांची चाचपणी प्रशासनाकडून सुरू आहे . अशा उद्योगाना विविध सवलती देण्यात येणार आहेत . कृत्रिमवाळू धोरणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत - १. नैसर्गिक वाळूचा वापर कमी करणे . २ . वाढती मागणी पुर्ण करण्यासाठी अतिरिक्त स्त्रोत विकसित करणे . ३. कृत्रीम वाळू विकासास प्रोत्साहन देणे. ४. एम सॅन्ड युनिटला उदयोग म्हणुन प्रोत्साहन देणे . ५. बी एस आय ने ठरवुन दिलेल्या मानकांनुसार दर्जेदार एम-सॅन्ड ला प्रोत्साहन देणे . ६. एम-सॅन्ड उत्पादन प्रक्रीयेचे मानकीकरण करणे . ७. शुन्य कचरा खाणकामाला प्रोत्साहन देणे . ८ . उदयोग म्हणुन एम-सॅन्ड युनिटची स्थापना करणे

निर्मिती प्रकल्प उभारण्याचे प्रयत्न :- बीड जिल्ह्यात कृत्रिम वाळू निर्मितीचे फारसे उद्योग उपलब्ध नाहीत . यामुळे जिल्ह्यात बांधकाम व्यावसायिक व शासकीय कंत्राटदारांना कृत्रिम वाळू उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्प उभारण्याची तयारी प्रशासनाकडून सुरू करण्यात आलेली आहे .

एम सॅन्ड युनिटसाठी शासकीय प्रोत्साहन : - १. उदयोग म्हणुन एम-सॅन्ड युनिटची स्थिती कायम राहील . २ . एम-सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी किमान निव्वळ उत्पन्न मर्यादा व आर्थीक उलाढालीची आवश्यकता नाही . ३. त्यानुसार प्रत्येक जिह्लयात प्रथम पुढाकार घेणा-या ५० इच्छुक / संस्था यांना एम-सॅन्ड युनिट स्थापन करण्यासाठी उदयोग विभागाच्या व महसुल विभागाच्या सवलती लागु राहतील . ४. शासकीय जमीनीवरील खाणपटट्यांसाठी लिलावामध्ये केवळ एम-सॅन्ड युनिट कार्यान्वीत करण्यासाठी भाग घेता येईल . ५ . शासकीय जमीनीवरील व खाजगी जमीनीवर एम-सॅन्ड युनिट करीता ५ एकरांपर्यंत खाणपट्टयासाठी जागा मंजुर करता येईल . शासनाची पुर्वमान्यता आवश्यक . ६ . अशा शासकीय व खाजगी जमीनीवर १ वर्षात एम-सॅन्ड युनिट सुरु करणे बंधनकारक आहे . ७. एम-सॅन्ड युनिट धारकांनी उत्खनन करतांना जलस्त्रोत तयार होण्यासाठी उत्खनन वर्तुळकार / चौरस / आयात आकारात करणे बंधनकारक जेणेकरुन नंतर ती जागा जलसंधारण विभागास पाण्यासाठी वापरता येईल . अशा खदानीतील उत्खनन पुर्ण झाल्यावर तहसिलदार ती जागा जलसंधारण विभागाच्या ताब्यात देतील . ८. यापुर्वी खाणपटयांचे मंजुरी / नुतणीकरण ( शासकीय जमीनीवरील ) करण्यात आलेले आहे अशा खाणपट्टाधारक यांनी ३ वर्षात स्टोन क्रशर व एम-सॅन्ड युनीट उभारून उत्पादन करणे बंधनकारक आहे . ९ . नविन क्रशरला प्रदुषण विभागाने परवाना देतांना व जिह्लाधिकारी कार्यालयाने व्यापारी परवाना देतांना संबंधितास तीन वर्षात एम-सॅन्ड युनिट उभारणे बंधनकारक राहील . १० . खाजगी क्षेत्रावरील मंजुर व नुतणीकरण करण्यात आलेल्या खाणपट्टाधारक यांना पुढील ३ वर्षात एम- सॅन्ड युनिट कार्यान्वीत करुन एम-सॅन्ड उत्पादन करणे बंधनकारक राहील . उत्खनन वर्तुळकार / चौरस / आयात आकारात करणे बंधनकारक आहे . ११ . १०० टक्के एम-सॅन्ड चे उत्पादन करणा-या खाणपट्टाधारकास स्वामित्वधनात सवलत रु. ६००/- ऐवजी रु. ४००/- प्रमाणे स्वामित्वधन भरावे लागेल जिल्ह्यात किमान ५० एम सँड निर्मिती प्रकल्प उभारण्याचे प्रयत्न सुरू झालेले आहेत . असे प्रकल्प उभारणाऱ्या उद्योजकास विविध सवलती देण्यात येणार आहेत . जिल्ह्यात कृत्रिम वाळू निर्मिती प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात जिह्लाधिकारी विवेक जॉन्सन प्रयत्नशील आहेत . शासनाच्या निर्णयानुसार , शासकीय कामांसाठी २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात आलेले आहे . जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात ५० प्रकल्प उभारण्याविषयी अपर जिह्लाधिकारी हरीश धार्मिक आग्रही आहेत . .

# महायुती सरकारच्या फसव्या घोषणे विरोधात शिवसेनेचा उद्या रस्ता रोको शेतकरी व लाडक्या बहिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचे आवाहन


बीड: (प्रतिनिधी ): महायुती सरकार कडुन सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी सह अनेक प्रलोभने दाखवली होती, तसेच लाडक्या बहिणींना पण १५०० रुपया वरून २१०० रुपये महिना करू असे आश्वासन दिलेले होते, मात्र सत्तेत आल्यानंतर या आश्वासनाचा महायुती सरकारला विसर पडला. सत्तेवर आल्या नंतर महायुती सरकार सातत्याने शेतकऱ्यावर अन्याय करत असून जुलमी धोरणे राबवून देशोधडीला लावण्याचे काम करत आहे. निवडणुकी पूर्वी ज्या फसव्या घोषणा केल्या त्या विरोधात उद्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले आहे.

अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही, मोफत वीज, पाणंद रस्ते, हर घर जल, हर घर छत या आश्वासनाकडे ही महायुती सरकारने कानाडोळा करीत दुर्लक्ष केले आहे, म्हणून या विसर भोळ्या सरकारला झोपेतून जागे करण्यासाठी शिवसेना पक्षाकडून क्या हुआ तेरा वादा ङ्ग असा जाब विचारून आंदोलन करण्यात येत आहे त्याचाच एक भाग शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उद्या बुधवार दिनांक रोजी, सकाळी ११ वाजता, महालक्ष्मी चौक बीड बायपास जवळ संभाजी महाराज यांच्या पुतळ्या शेजारी, भव्य रस्ता रोको करण्यात येणार आहे.

या रस्ता रोको आंदोलनास मोठया संख्येने शेतकरी, लाडक्या बहिणींनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख राजू महूवाले, हनुमान जगताप आशिष मस्के, सहसंघटक रतन गुजर, युवा सेना जिल्हा संघटक अभिषेक दिवे, महिला आघाडी जिल्हा संघटक मीरा ताई नवले विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, कामगार आघाडीचे जिल्हा संघटक रवी वाघमारे, अल्पसंख्यांक आघाडीचे संघटक सय्यद नय्युम, शिव वाहतूक सेनेचे मशरू पठाण, सतीश परदेशी, दिलीप पवार, गणेश लोणकर, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे यांनी केले आहे.

# शिवरायांप्रतीचा आदर आचरणातही दिसावा !

शिवजयंती आणि शिवराज्याभिषेक दिन हे समस्त शिवभक्तांच्या जीवनातील प्रमुख उत्सव. यंदा पावसाळा असतानाही किल्ले रायगडावर शिवभक्तांच्या अफाट सागर लोटलेला पाहायला मिळाला. आपल्या प्रगल्भ बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शहा देणाऱ्या. कडे-कपाऱ्यांतील मावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल. शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे पोहोचली आहे. जगातील अनेक विद्यापीठांमधून आज शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आज दिसत आहे. ट्रेन बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर सर्रासपणे करताना आढळतात. गाड्यांवर लावण्यात आलेले महाराजांच्या प्रतिमेचे अथवा नावाचे स्टिकर म्हणजे खुद्द महाराजच आहेत या भावाने त्याची नियमितपणे स्वच्छता करणारे शिवभक्तही तुलनेने कमीच आहेत. स्वतः ला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण रस्त्यावर वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात.



गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही ? जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टीविषयी आपल्यामध्ये तितकेसे गांभीर्य नसले, तरी समाज आपल्याकडे शिवभक्त म्हणून आदराने पाहतो हे ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा !

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार १२ जून २०२५
https://lokaarambh.com


# “खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे...”

## मायेच्या उपासक साने गुरुजी यांची पुण्यतिथी

विशेष वृत्त
आज ११ जून. साने गुरुजींची पुण्यतिथी. प्रेम, करुणा, सेवा



आणि निःस्वार्थ समर्पण या मूल्यांची शिकवण देणाऱ्या साने गुरुजींचे नाव आजही मराठी जनमानसात आदराने घेतले जाते. पांडुरंग सदाशिव साने, उर्फ साने गुरुजी, यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड गावात झाला. बालपणीच मातृप्रेमाने संस्कारित झालेले त्यांचे जीवन ज्ञान, त्याग, आणि राष्ट्रसेवेच्या मार्गावर वाहिले गेले. त्यांनी इंग्रजी साहित्यात एम.ए. पदवी मिळवली आणि अमळनेरच्या प्रताप हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत राहिले. अमळनेरच्या वसतिगृहातील त्यांच्या कार्यामुळे त्यांना मोठी प्रसिद्धी मिळाली. विद्यार्थ्यांना स्वावलंबन आणि मूल्यशिक्षण देणाऱ्या साने गुरुजींनी ‘विद्यार्थी’ मासिक सुरू करून विचारप्रवर्तनाचा मार्ग स्वीकारला. महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव असलेले साने गुरुजी खादीवस्त्रांचा वापर करत. त्यांनी १९३० मध्ये शिक्षकाची नोकरी सोडून सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला. ‘काँग्रेस’ हे साप्ताहिक काढले आणि फैजपूर काँग्रेस अधिवेशनात महत्त्वाचे योगदान दिले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिकेतून कार्य केले. साहित्य, सामाजिक कार्य आणि राष्ट्रसेवा यांचा त्रिवेणी संगम म्हणजे साने गुरुजी. त्यांच्या ‘पत्री’ या काव्यसंग्रहातील ‘बलसागर भारत होवो’ ही कविता आजही प्रेरणादायी मानली जाते. १९४२ च्या चळवळीदरम्यान त्यांनी भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार केला आणि ‘आंतरभारती’ या भाषासंवादाच्या कल्पनेला मूर्तरूप देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या विचारांची गूंज आजही समाजात ऐकू येते. ११ जून १९५० रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला. आज त्यांचे पालगडमधील घर साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक म्हणून जपले जात आहे. त्यांच्या पुतणीने ते राष्ट्राला अर्पण केल्यावर स्मारक म्हणून त्याची सेवा सुरू झाली आहे. साने गुरुजी म्हणजे मायेची मूर्ती, विचारांचा दीपस्तंभ, आणि समतेचा उपासक. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना कृतज्ञ श्रद्धांजली!

# गुटखा बंदी केवळ नावापुरती; बीड जिल्ह्यात खुलेआम विक्री – यंत्रणाच मूकदर्शक!

बीड प्रतिनिधी राज्य सरकारने कितीही गुटखाबंदीचा आदेश दिला असला तरी बीड जिल्ह्यात गुटख्याचा धंदा मात्र जोमात सुरु आहे. “गुटखा येतो कुठून आणि जातो कुठे?” हा प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण झाला असला, तरी प्रशासनात बसलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना याची संपूर्ण माहिती असूनही ते मूग गिळून गप्प आहेत. यामुळेच या अवैध व्यवसायाला अप्रत्यक्षपणे सरकारी यंत्रणाच पाठबळ देत असल्याचा संशय बळावतो आहे. गुटखा कसा येतो आणि कसा विकला जातो? राज्य सरकारच्या बंदी आदेशानंतरही गोवा, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड या परराज्यांतून मोठ्या प्रमाणावर राजनिवास, विमल, बाबा, हिरा,आरएमडी अशा नामांकित ब्रँड्सचा गुटखा बीडमध्ये येतो. हे सर्व पोलिस यंत्रणा, अन्न व औषध प्रशासन च्या आशीर्वादानेच शक्य होत असल्याचे स्थानिक सूत्रांचे म्हणणे आहे. तपासाऐवजी “दुरून पाहणं” सुरू बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुटख्याची विक्री उघडपणे किराणा दुकाने, पान टपऱ्या आणि अगदी शाळेजवळच्या दुकानांमध्येही सर्रास सुरु आहे. मात्र, पोलिस निरीक्षक, फूड ऑफिसर यांना याचे कधीच






‘भान’ येत नाही. चेकपोस्टवर “मर्जीतला माणूस” गुटखा नेमका चेकपोस्टवरून कसा पास होतो, याचे उत्तर म्हणजे तिथे नेहमीच संबंधितांचे “मर्जीतले लोक” उपस्थित असतात. त्यामुळे वाहने अडवली जात नाहीत. अनेकदा ट्रक, चारचाकी गाड्यांमध्ये गुटखा लपवून आणला जातो आणि कुठेही अडथळा न येता बीडमध्ये पोहोचवला जातो. बीड जिल्ह्यातील वास्तव गुटखा बंदी असलेल्या महाराष्ट्रात बीड जिल्ह्यात अशी एकही बाजारपेठ, गाव किंवा बसस्टँड नाही जिथे गुटखा सहज उपलब्ध नाही. ग्रामीण भागात देखील ठराविक दुकानदारांकडून गुपचूप गुटखा विक्री केली जाते आणि याला स्थानिक राजकीय संरक्षणही असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. राज्यस्तरावरील यंत्रणेने लक्ष घातल्यास मोठे घबाड हाती लागेल या गुटखा रॅकेटमागे मोठे मासे आहेत. केवळ जिह्ल्ला स्तरावरच नव्हे तर राज्यातील काही वरिष्ठांपर्यंत याचा नफा पोहोचतो, अशी माहितीही गुप्तचर यंत्रणांनी वेळोवेळी दिली आहे. जर राज्याचे अन्न व औषध विभाग, सीआयडी किंवा गुप्तचर विभागाने थेट बीडमध्ये छापा मारले, तर लाखोंचा गुटखा साठा आणि यंत्रणेतील गटबाजी उघड होऊ शकते.

# नगरपरिषद व इतर निवडणूका समाजवादी पार्टी पूर्ण ताकतीनिशी लढणार – नवीदोद्दीन सिद्दिकी


माजलगाव / प्रतिनिधी माजलगाव समाजवादी पार्टी तालुका अध्यक्ष यांच्या नेतृत्वात लवकरच कार्यकर्ता मेळावा व पक्ष वाढविण्यासाठी सभासद नोंदणीचे आयोजन तसेच माजलगाव तालुक्याची समाजवादी पक्षाची शहर कार्यकारणी बरखास्त करण्यात येणार असून समाजवादी पक्षाच्या नूतन शहराध्यक्ष व इतर पदाची नवनियुक्ती महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अबू असीम आझमी साहेब व बीड जिल्हाध्यक्ष खम्मरुल ईमान खान साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी व पक्षाची विचारधारा पुढे घेऊन जाण्यासाठी तसेच पक्ष मजबूत करण्यासाठी, नागरिकांच्या प्रश्नावर ठामपणे उभा राहून कार्य करणारे असे तालुक्यातील व जिल्ह्यातील जिद्दी



धडाडीचे तरुण तडफदार कार्यकर्त्यांना संधी देऊन लवकरच पद नियुक्ती जाहीर करण्यात येणार आहे. या कार्यकर्ता मेळाव्या मध्ये समाजवादी पक्षाचा विस्तार, व संघटन वाढविण्यासाठी सभासद नोंदणी करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजवादी पार्टी तालुक्यातील प्रत्येक घराघरांमध्ये कसा पोहोचेल याचे ध्येय धोरण देखील ठरवण्यात येणार आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्थे च्या सर्व निवडणुका जसे की, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व इतर सर्व निवडणूका समाजवादी पार्टी पूर्ण ताकतीनिशी लढवणार आहे तरी इच्छुकांनी, नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी व सभासदांनी पक्षाशी जुळून जिल्ह्यातील दर गोक्रगरीब, कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर, अल्पसंख्याक व इतर समाजावर होणारे अन्यायअत्याचारा च्या विरोधात लढण्यासाठी समाजवादी पार्टीशी जोडावे व माजलगाव संपर्क कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन समाजवादी पार्टी तालुकाध्यक्ष नविदोद्दीन सिद्दिकी यांनी केले आहे.

## नगरपरिषद व इतर निवडणूका समाजवादी पार्टी पूर्ण ताकतीनिशी लढणार - नवीदोद्दीन सिद्दिकी

माजलगाव / प्रतिनिधी माजलगाव समाजवादी पार्टी तालुका अध्यक्ष यांच्या नेतृत्वात लवकरच कार्यकर्ता मेळावा व पक्ष वाढविण्यासाठी सभासद नोंदणीचे आयोजन तसेच माजलगाव तालुक्याची समाजवादी पक्षाची शहर कार्यकारणी बरखास्त करण्यात येणार असून समाजवादी पक्षाच्या नूतन शहराध्यक्ष व इतर पदाची नवनियुक्ती महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अबू असीम आझमी साहेब व बीड जिल्हाध्यक्ष खम्मरुल ईमान खान साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी व पक्षाची विचारधारा पुढे घेऊन जाण्यासाठी तसेच पक्ष मजबूत करण्यासाठी, नागरिकांच्या प्रश्नावर ठामपणे उभा राहून कार्य करणारे असे तालुक्यातील व जिल्ह्यातील जिद्दी धडाडीचे तरुण तडफदार कार्यकर्त्यांना संधी देऊन लवकरच पद नियुक्ती जाहीर करण्यात येणार आहे.




या कार्यकर्ता मेळाव्या मध्ये समाजवादी पक्षाचा विस्तार, व संघटन वाढविण्यासाठी सभासद नोंदणी करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. समाजवादी पार्टी तालुक्यातील प्रत्येक घराघरांमध्ये कसा पोहोचेल याचे ध्येय धोरण देखील ठरवण्यात येणार आहे. याच अनुषंगाने महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्थे च्या सर्व निवडणुका जसे की, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व इतर सर्व निवडणूका समाजवादी पार्टी पूर्ण ताकतीनिशी लढवणार आहे तरी इच्छुकांनी, नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी व सभासदांनी पक्षाशी जुळून जिल्ह्यातील दर गोक्रगरीब, कष्टकरी, शेतकरी, शेतमजुर, अल्पसंख्याक व इतर समाजावर होणारे अन्यायअत्याचारा च्या विरोधात लढण्यासाठी समाजवादी पार्टीशी जोडावे व माजलगाव संपर्क कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन समाजवादी पार्टी तालुकाध्यक्ष नविदोद्दीन सिद्दिकी यांनी केले आहे.

# 22 वर्षांनंतर ‘काटा’ येथे गेट-टुगेदर: जुन्या आठवणींना उजाळा!

: तब्बल २२ वर्षांनंतर श्री कला बहादुर शास्त्री विद्यालय, काटा येथे २००३-०४ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर कार्यक्रम उत्साहात पार पडला. जुन्या आठवणींना उजाळा देणारा आणि विद्यार्थीदशेतील गोड क्षण पुन्हा अनुभवण्याचा हा अनोखा क्षण ठरला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वाघ गुरुजी यांनी भूषवले. यावेळी प्राचार्य भालेराव सर, देशमुख सर, मोड मॅडम, वाघ मॅडम, कोतीवार सर, गोरे सर आणि घुले सर यांची मान्यवर उपस्थिती होती. कार्यक्रमातील प्रमुख घडामोडी: सूत्रसंचालन: वंदना देशमुख आणि गजानन देशमुख प्रास्ताविक: प्रा. रवी बुंधे आभार प्रदर्शन: प्रा. इस्माईल खान




या कार्यक्रमासाठी २००३-०४ च्या बॅचमधील अनेक वर्गमित्र एकत्र आले होते. एकमेकांना भेटून सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाचे व उत्साहाचे भाव दिसून आले. हा गेट-टुगेदर कार्यक्रम श्रीकांत मंत्री, गजानन देशमुख, मुन्ना बोलवार, अर्जुन गुडदे, किशोर धामणे, विठ्ठल देशमुख, आणि परमेश्वर सरनाईक या माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने पार पडला. शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देणारा आणि नातेसंबंध पुन्हा घट्ट करणारा हा गेट-टुगेदर कार्यक्रम सर्वांच्या मनात कायमची आठवण ठेऊन गेला.

# रक्तदानासाठी नवा संकल्प – यवतमाळमध्ये भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

यवतमाळ: “संकल्प नवा, ध्यास नवा — प्रत्येक घरी एक रक्तदाता हवा” या प्रेरणादायी घोषवाक्याला अनुसरून २७ जून २०२५ रोजी यवतमाळ शहरात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, यवतमाळ आणि ध्येय सोशल वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. रक्तदान शिबीर सकाळी १० वाजल्यापासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार असून, शिबीराचे ठिकाण आहे: मुख्य शाखा, स्टेट बँक चौक, धामणगाव रोड, यवतमाळ शिबीराच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांनी रक्तदान करून समाजासाठी आपले योगदान द्यावे, असा संदेश आयोजकांनी दिला आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र आणि आरोग्य तपासणी सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाणार आहे. आपल्या थेंबाने वाचू शकते एखाद्याचे संपूर्ण जीवन — चला, रक्तदान करून माणुसकी जपूया!



**मा,श्री डॉ, विशालजी पिंगळकर साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक अभिनंदन करुन शुभेच्छा देताना द्वारकाधीश मित्र मंडळ बीड**

# पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ देवस्थानच्या जमिनीवर अतिक्रमण
# पुजाऱ्यांचे आमरण उपोषण सुरू!

पंचम ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू श्री वैद्यनाथ देवस्थानची इनामी जमीन आज भूमाफियांच्या घशात जाण्याच्या मार्गावर असून, दुर्दैव म्हणजे स्थानिक प्रशासन याकड डोळेझाक करत असल्याने देवस्थानचे पुजारी आणि त्यांचे कुटुंबीय थेट रस्त्यावर आले आहेत. प्रशासनाच्या उदासीनतेचा निषेध करत बुधवारी (११ जून २०२५) पासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. उपोषण सुरू होऊनही एकाही प्रशासकीय अधिकाऱ्याने भेट देण्याची तसदी घेतलेली नाही. यावरून प्रशासनाच्या संवेदनशून्यतेची परिसीमा ओलांडली गेल्याचे स्पष्ट होते. उल्लेखनीय म्हणजे, प्रभू वैद्यनाथ देवस्थानची इनामी जमीन अतिक्रमणग्रस्त असल्याचे माननीय उच्च न्यायालय व अप्पर जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार झालेल्या अधिकृत तपासणीत स्पष्ट झाले आहे. संबंधित मंडळ अधिकाऱ्यांनी दोन ते तीन वेळा पाहणी करून अतिक्रमणाच्या अहवाल प्रशासनास सादर केले आहेत. तरीदेखील अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही, यामागे कोणाचे हितसंबंध आहेत? असा प्रश्न निर्माण झाला आहे.यावेळी पुजारी मंडळाने जारी केलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, आम्ही देवासाठी सेवा करणारे! परंतु आज देवाच्या भूमीसाठीच आम्हाला उपोषण करावं लागत आहे, ही काळीमा फासणारी स्थिती आहे असल्याचे अशोक बंडू पुजारी यांनी सांगितले.या आंदोलनाला आता विविध सामाजिक संस्था, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व नागरिकांचा सक्रिय पाठिंबा मिळू लागला आहे. यामुळे या लढ्याला आता जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त होत आहे.जवाब द्या प्रशासन! न्यायालयाचे आदेश असताना कारवाई का नाही? भूमाफियांना अभय कुणाकडून? धार्मिक संस्थेच्या जमिनीवर अतिक्रमण




आणि सरकार मौन का? असा संतप्त सवाल उपस्थित महिला पुजाऱ्यांनी केला आहे. अन्यथा हा संघर्ष राज्यव्यापी होईल आकाश पुजारी हे केवळ जमीनबाबतचे आंदोलन नाही – हे धर्म, न्याय आणि श्रद्धेच्या रक्षणासाठीचे युद्ध आहे! प्रशासनाने आता जागे व्हावे अन्यथा हा संघर्ष राज्यव्यापी होईल, असा इशाराही देवस्थानचे आकाश पुजारी यांनी दिला आहे.

## या मागण्या आहेत ठाम:

१. अतिक्रमण तात्काळ हटवावे.
२. दोषींवर गुन्हे दाखल करावेत.
३. देवस्थानच्या जमिनीचे संरक्षण सुनिश्चित करावे.
४. पुजाऱ्यांना आणि कुटुंबीयांना संरक्षण द्यावे

स्वप्निल गणेश पुजारी यांचे जोरदार वक्तव्य: देवासाठी सेवा करणाऱ्या आम्हा पुजाऱ्यांना आज देवाच्या जमिनीसाठीच रस्त्यावर उतरावं लागत आहे, हे दुर्दैव नाही का? न्यायालयाचे स्पष्ट आदेश असूनही प्रशासन कारवाई करत नसेल, तर हा न्याय व्यवस्थेचा अपमान आहे. आम्ही मागे हटणार नाही. अतिक्रमण हटल्याशिवाय आणि देवस्थानची जमीन ताब्यात आल्याशिवाय उपोषण थांबणार नाही!– स्वप्निल गणेश पुजारी

बीड/महाराष्ट्र
आंतरराष्ट्रीय विशेष

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार १२ जून २०२५
https://lokaarambh.com



# चीनला मोठा झटका, ७२ कोटीच चिनी फायटर जेट साध्या मशीन गनने पाडल

ऑपरेशन सिंदूरने चिनी शस्त्रास्त्रांची मर्यादा स्पष्ट केली. त्यानंतर आता म्यानमार सुरु असलेल्या लढाईतही चिनी शस्त्रांच्या क्षमतेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण केलय. म्यानमारमध्ये सैन्य आणि बंडखोर गटांमध्ये हिंसक संघर्ष सुरु आहे. म्यानमारच सैन्य चिनी फायटर जेट्समधून बंडखोरांवर बॉम्ब वर्षाव करत आहे. पण मंगळवारी बंडखोर गटाने एका चिनी जेटला लक्ष्य केलं. म्यानमारच्या स्थानिक मीडियानुसार बंडखोर गटाच्या फायटर्सनी म्यानमारच्या सैन्याच हे फायटर जेट पाडलं. म्यानमारने चीनकडून हे फायटर जेट विकत घेतलं होतं. या फायटर जेटची किंमत 72 कोटीच्या घरात आहे. असोसिएटेड प्रेसने पीपुल्स लिबरेशन आर्मीच्या हवाल्याने लिहिलय की, म्यानमारच्या सैन्याने चिनी फायटर जेटच्या माध्यमातून बॉम्ब वर्षाव सुरु केला. लिबरेशन आर्मीच्या फायटर्सनी हे जेट पाडलं. चीन किंवा म्यानमारने अजून या घटनेवर अधिकृत टिप्पणी केलेली नाही. पीएलएचा दावा योग्य असेल तर तो चीनसाठी एक झटका आहे. पीएलएल फायटर्सकडे कुठलही अत्याधुनिक शस्त्र नाहीत.



पीएलएचे फायटर्स मशीन गन आणि गनिमी काव्याच्या माध्यमातून म्यानमारच्या सैन्याविरुद्ध लढत आहेत. साध्या मशीन गनने चिनी फायटर जेट पाडल असेल, तर चिनी शस्त्रांच्या क्रेडिबलिटीबद्दल मोठ प्रश्नचिन्ह निर्माण होतय. चीनने 2023 साली म्यानमारला 1 अब्ज डॉलर्सची शस्त्रास्त्र दिली होती. म्यानमारशिवाय चीन पाकिस्तानला सुद्धा शस्त्र विकतो. न्यूयॉर्क टाइम्समध्ये अलीकडेच एक रिपोर्ट प्रकाशित झाला होता. त्यानुसार, चीनच्या सांगण्यावरुन पीएलए बंडखोरांनी म्यानमार सैन्याकडून जिंकलेल्या जमिनीवरील ताबा सोडला होता.

### फायटर जेट पाडण्यासाठी कुठली गन वापरली?

मशीन गनच्या माध्यमातून फायटर जेट पाडण्यात आलं असा प्रत्यक्षदर्शीच्या हवाल्याने स्थानिक वर्तमानपत्र द इरावड्डीने दावा केलाय. प्रत्यक्षदर्शीनुसार 0.50 कॅलिबर एम2 ब्राउनिंग मशीन गनच्या माध्यमातून विमान पाडण्यात आलं. सरकार आणि पीएलएकडून या बद्दल अजून टिप्पणी करण्यात आलेली नाही. 4 जून रोजी सागाइंगच्या पाले टाऊनशिपमध्ये कान दौक पोलीस स्टेशन ताब्यात घेण्यासाठी अभियान सुरु केलं होतं, अशी माहिती PLA ने दिली. या दरम्यान म्यानमार सैन्याच्या फायटर जेट आणि Y-12 विमानांनी मोठ्या प्रमाणात बॉम्बवर्षाव केला. यावेळी प्रत्युत्तराच्या कारवाईत PLA ने 50 कॅलिबरच्या M2 ब्राउनिंग मशीन गनने त्यांच्यावर बॉम्ब वर्षाव करणारं फायटर जेट पाडलं.

# पाटोदा तालुक्यातील ग्रामीण भागात ई-लर्निंग, डिजिटल शिक्षण स्वप्नवतच

पाटोदा : शासनस्तरावरुन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन डिजीटल, ई-लर्निंग शिक्षणास प्राधान्य दिले जात आहे. त्या दृष्टीने जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये संगणकाची सुविधा उपलब्ध, प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. परंतु यात पाटोदा तालुकामात्र मागे राहिला असुन तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी अत्याधुनिक साधणे आणि सुविधांमुळे ई-लर्निंग, डिजीटल शिक्षणापासून वंचित राहू लागला आहे. पाटोदा तालुक्यातील शाळांची दुर्दशा झाली आहे. मोडकळीस आलेल्या शाळेच्या इमारती, विद्यार्थी, शिक्षकांसाठी असणाऱ्या सुविधांचा अभाव आहे. सध्या तालुक्यात १८१ जिल्हा परिषद शाळांपैकी २८ शाळांमध्ये संगणक आहे. परंतु उर्वरीत १५३ शाळांमधील विद्यार्थ्यांनी अद्यापही संगणक पाहिले नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञान वापराच्या दृष्टीने शाळांमध्ये विद्युत पुरवठा सुरळीत असणे आवश्यक



आहे. परंतु तालुक्यातील १६१ शाळांतील विजेचे बील थकल्याने विद्युत पुरवठा खंडीत करण्यात आला आहे. यामुळे ईलेक्ट्रॉनिक साधाणांचा वापर करणे शक्य होत नाही. यामुळे या शाळांसाठी ई लर्निंग, एलईडी टीव्ही, संगणक हे फक्त कागदोपत्रीच राहिले आहेत. शिक्षण विभागाकडून १७० शाळांमध्ये ई-लर्निंगची सुविधा असल्याचा दावा केला जात आहे. तर ११० शाळांमध्ये एलईडी टीव्ही उपलब्ध असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु वस्तुस्थिती वेगळी असुन अद्यापही अनेक शाळांमध्ये या सुविधा पोहचल्याच नाहीत.

## श्रीक्षेत्र रामगड डोंगरावर बंकटस्वामी महाविद्यालयाने केले वृक्षारोपण



बीड : शहरातील बंकटस्वामी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १० जून रोजी तालुक्यातील श्रीक्षेत्र रामगड येथील डोंगरावर वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. प्रा. अरुण राजाराम दैतकार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर शिवशेट्टे, राष्ट्रीय छात्र सेनाप्रमुख डॉ. जगन्नाथ चव्हाण, प्रा. रणजित आखाडे, प्रा. रमेश वळवी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची उपस्थिती होती. याप्रसंगी देशी वनस्पतींची लागवड करण्यात आली. श्री बंकटस्वामी महाविद्यालयाने यापूर्वीही दंडकारण्य नावाचा घनवन प्रकल्प श्रीक्षेत्र रामगड या ठिकाणी यशस्वीपणे राबवला आहे. प्रभू श्री रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या रामगड परिसराला पूर्वीचे नैसर्गिक वैभव प्राप्त करून देण्याचे काम महाविद्यालयाने हाती घेतले आहे.

## अभिनव विद्यालयात गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे केले स्वागत



परळी : येथील ज्ञान प्रबोधिनी विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अभिनव विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षास उत्साहात प्रारंभझाला. शाळेच्या पहिल्या दिवशी गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. सोमवार दि. ९ जून २०२५ रोजी अभिनव माध्यमिक विद्यालयामध्ये संस्थेचे सचिव साहेबराव फड यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करुन पुढील शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शाळा पुन्हा एकदा चैतन्यमय वातावरणात सुरु करण्यात आली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी परिपाठ सादर केला आणि मार्गदर्शन करत नवीन संकल्पांची आठवण करून दिली. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून मार्गदर्शन देखील करण्यात आले आहे.

# रुंदीकरण करून सरस्वती नदीवरील संरक्षक भिंत बांधा : अश्विन मोगरकर

परळी : परळी शहरातील गावभागातून पुरातन काळापासून वाहनार्या सरस्वती नदीची शासन दप्तरी असलेली रुंदी मोजुन संपुर्ण पात्र ताब्यात घेत त्याप्रमाणे संरक्षक भिंतीची उभारणी करावी अशी मागणी भाजपा कार्यकर्ते अश्विन मोगरकर यांनी केली. याबाबत उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी नगरपालिकेस पत्र पाठवुन चौकशीची कार्यवाही सुरू केली आहे. जुन्या गावभागातुन



पुरातन काळापासुन सरस्वती नदी वाहते. शासन दप्तरी या नदीचे पात्र खुप मोठे असताना परळी नगरपरिषदेकडून शासन दप्तरी असलेल्या नोंदीप्रमाणे नदी पात्राचे रुंदीकरण न करता महाराष्ट्र शासनाच्या राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीतून सरस्वती नदीवर संरक्षक भिंत बांधण्याची प्रक्रिया चालू आहे. मूळ नदी पात्र व पुरक्षेत्र अतिक्रमण मुक्त होईपर्यंत व नदीचे रुंदीकरण करेपर्यंत सदरील संरक्षक भिंत बांधण्याची प्रक्रिया स्थगित करावी व नदीची मोजणी करून नागरिकांना पुराचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. नदीची रुंदी कमी झाल्यामुळे गावभागात दर पावसाळ्यात पूर येऊन नागरिकांच्या घरा दुकानात पाणी जाऊन प्रचंड नुकसान होत असते. पूरग्रस्तांना शासनाकडून नुकसान भरपाई द्यावी लागते. यामुळे सरकारचेही आर्थिक नुकसान होत आहे. मूळ सरस्वती नदीच्या पात्राची मोजणी केल्याशिवाय संरक्षक भिंतीच्या कामास परवानगी देऊ नये

# मागील ४२ वर्षांपासून हजारो अभियंत्यांच्या करिअरला दिशा देणारे टी.बी. गिरवलकर पॉलिटेक्निक शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नामांकीत कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीतून अंतिम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना मिळाली नौकरी

अंबाजोगाई (प्रतिनिधी) येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलीत, टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ २५ येथे विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विविध नामांकीत एम.एन.सी.कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीतून विद्यार्थ्यांना ते शिकत असतानाच नौकरी मिळाली हे विशेष होय. एप्रिल-२०२५ महिन्यांत विविध नामांकित कंपन्यांनी भेटी देऊन पॉलिटेक्निक मध्ये कॅम्पस मुलाखतींचे आयोजन केले होते. यामध्ये सर्वच्या सर्व (१४८) १०० टक्के विद्यार्थ्यांची निवड होऊन, पात्र विद्यार्थ्यांना आकर्षक पगारावर काम करण्याची संधी मिळाली. तसेच द्रितीय वर्षांतील ११३ विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसाठी आकर्षक मानधनावर



नामांकीत कंपन्यांमध्ये कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळवून देण्यात आली. टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक हे मागील ४२ वर्षांपासून तंत्रशिक्षणात विद्यार्थ्यांना घडवत आलेले, ग्रामिण भागातील एक नांवाजलेले एकमेव पॉलिटेक्निक आहे. म्हणून या पॉलिटेक्निक मध्ये पुर्वीपासूनच प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा ओढा आणि पालकांची पसंती आहे. मागील शैक्षणिक वर्षापासून या पॉलिटेक्निक मध्ये, दोन नविन अभ्यासक्रमास तंत्रशिक्षण परीषदेने मंजूरी दिली आहे. त्यामध्ये सिव्हिल इंजिनिअरींग व ईलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्यूटर इंजिनिअरींग हे होय. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आता एकूण पाच अभ्यासक्रम उपलब्ध झालेले आहेत. कॉम्प्यूटर इंजिनिअरींग, ईलेक्ट्रीकल इंजिनिअरींग, मेकॅनिकल इंजिनिअरींग व दोन नविन अभ्यासक्रमामुळे ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या अभ्यासक्रमात डिप्लोमा इंजिनिअरींग होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेत या पॉलिटेक्निकचा निकाल सतत उंचावत आलेला आहे. उन्हाळी परीक्षेत विद्यार्थीनींनी निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यावर्षी म.रा.तं.शिक्षण मंडळाच्या गुणवत्ताधारक शिष्यवृत्ती करीता, १३ विद्यार्थी पात्र ठरले. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर भर दिला जातो. देश, विदेशात या पॉलिटेक्निकचे विद्यार्थी विविध पदांवर काम करीत आहेत. त्या माजी विद्यार्थ्यांकडून त्यांच्या कामाचा अनुभव व मार्गदर्शन सध्या शिक्षण घेत असलेल्या पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना होत आहे. हेच विद्यार्थी देशाचे व महाविद्यालयाचे नांव उज्वल करीत आहेत. टी.बी. गिरवलकर पॉलिटेक्निक येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये क्रिडा स्पर्धा, शिवजयंती उत्सव-२०२५, वृक्षारोपण, मुलींसाठी आत्मभान शिबीर, प्रकल्प स्पर्धा, अर्थ साक्षरतेचे महत्व अशा विविध उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जानेवारी-२०२५ महिन्यांत छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या आय.ई.डी. एस.एस.ए.अंतर्गत क्रिडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी बॅडमिंटन, व्हॉलिबॉल, क्रिकेट, बुद्धीबळ या स्पर्धांमध्ये भाग घेऊन बॅडमिंटन स्पर्धेत द्रितीय पारीतोषिक मिळविले. फेब्रुवारी-२०२५ महिन्यांत लातूर येथे झालेल्या प्रकल्प स्पर्धेत प्रकल्प सादर करून सहभाग नोंदविला. तसेच शिवजयंतीनिमित्त रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, गड किल्ले बनविणे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महिलांच्या आरोग्याची काळजी यावर मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.अरूणा केन्द्रे, डॉ.अर्चना थोरात, डॉ.नवनाथ घुगे या तज्ज्ञ डॉक्टरांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मार्च-२०२५ महिन्यांत महिला दिनानिमित्त सावित्रिमाई फुले यांच्या शिक्षण विषयक कार्यावर मुलींनी भाषणातून आपले विचार व्यक्त केले. तसेच मुलींसाठी आयोजित केलेल्या शिवकालीन युद्ध व मर्दानी खेळांचे प्रशिक्षण यामध्ये, लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा यांचे प्रशिक्षण देण्यात आले. सोबतच मव्यक्तिमत्व विकासफ या विषयावर बि.के.कबीर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पॉलिटेक्निकच्या संगणक अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांनी टेककिर्तीचे आयोजन केले होते. महाविद्यालयाच्या व विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ बसवंतराव सांगवे, उपाध्यक्ष माधवराव त्रिंबकराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव हणमंतराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल सिद्रामप्पा मिटकरी, सर्व सन्माननीय संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व मार्गदर्शक डॉ.बी.आय. खडकभावी यांनी अभिनंदन केले. पॉलिटेक्निकचे प्राचार्य एल.व्हि.बगले व सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक आणि कर्मचारीवृंद यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबत त्यांच्या सर्वांगिण विकासावर सुधारणा घडवून आणत आहेत. विविध नामांकीत कंपन्यांच्या कॅम्पस मुलाखतीतून विद्यार्थ्यांना ते शिकत असतानाच नौकरी देणारे टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक हे ग्रामीण भागातील तरूणांसाठी नेहमीच आशेचा किरण बनले आह

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com